| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | [1][(तेरा) गट पातळी पर्यवेक्षक | (१) (अ) ज्यांनी जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) द्वितीयश्रेणी मधील पाच वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा केली असेल अशा लस टोचकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल,<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [2][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल आणि,<br>(दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तूल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि ज्यांनी शासन मान्यताप्राप्त स्वच्छता निरीक्षकांचा पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ५० . ५० असे राहील.] |
| | | [3][(चौदा) महिला आरोग्य प्रचारक<br>(LHV) | महिला आरोग्य प्रचारकांच्या पदावरील नेमणूक ही, ज्या सहायक परिचारिका प्रसाविका ह्या—<br>(अ) सहा महिन्यांच्या ववती प्रशिक्षण पाठ्यक्रमानंतर घेतलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्या असतील, आणि<br>(ब) महाराष्ट्र परिचारिका परिषदेकडे ज्यांची नोंदणी झालेली असेल किंवा अशी नोंदणी होण्यास ज्या पात्र असतील, अशा मधून पात्रतेनुसार वरिष्ठता क्रमाच्या आधारे योग्य त्या व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल : |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ डिसेंबर १९७९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २४ मे १९८४ अन्वये हा मजकूर नवा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | (दहा) साहाय्यकारी प्रसाविका (ANM) | जे उमेदवार— |
| | | | (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल आणि |
| | | | (दोन) ज्यांची अर्हता प्राप्त साहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |
| | | | अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | [1][(अकरा) कुष्ठरोग तंत्रज्ञ | [2](१) (अ) खंड (ब) च्या खंड (एक) व खंड (दोन) यामध्ये नमूद केलेल्या अर्हता असलेल्या लस टोचक किंवा कॉलरा (पटकी) रोगविषयक कार्यकर्ता ही पदे धारण करणाऱ्या व्यक्तीमधून, पात्रतेच्या अधीन राहून जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीस एकतर पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल, किंवा |
| | | | (ब) जे उमेदवार— |
| | | | (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत काम करीत नसून, ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल, |
| | | | (दोन) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र ४१) अन्वये स्थापन झालेल्या विभागीय मंडळामार्फत घेण्यात आलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १० जून १९७४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ जानेवारी १९८५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.